## पर्यावरणविषयक जनसुनावणीचे इतिवृत्त

**प्रकल्प प्रवर्तक मेसर्स जेएसडब्ल्यू एनर्जी पीएसपी सेव्हन लिमिटेड, गाव-खानू, ता.वेल्हे, जि.-पुणे असलेल्या १५०० मेगावॅट क्षमतेचा पाने ओपन लूप पंप स्टोरेज प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत**

---

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स जेएसडब्ल्यू एनर्जी पीएसपी सेव्हन लिमिटेड, गाव-खानू, ता.वेल्हे, जि.-पुणे असलेल्या १५०० मेगावॅट क्षमतेचा पाने ओपन लूप पंप स्टोरेज प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी शुक्रवार, दिनांक १८/१०/२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आलेली होती.

समन्वयक, श्री. कार्तिकेय लंगोटे, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे-१, यांनी मा.ज्योती कदम, अपर जिल्हादंडाधिकारी, पुणे तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती व इतर सदस्य तसेच प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या संस्था व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे म.प्र.नि. मंडळ आणि जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांच्यातर्फे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

सदर प्रकल्पास दिनांक ३०/०१/२०२४ रोजी पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन यांनी Terms of Reference (ToR) मंजूर करण्यात आला. त्यानुसार प्रकल्प प्रवर्तकांने प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करुन भारत सरकारच्या पर्यावरण, वने व जल वायू परिवर्तन मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या १४ सप्टेंबर, २००६ च्या अधिसूचनेनुसार प्रकल्प प्रवर्तक मेसर्स जेएसडब्ल्यू एनर्जी पीएसपी सेव्हन लिमिटेड, गाव-खानू, ता.वेल्हे, जि.-पुणे असलेल्या १५०० मेगावॅट क्षमतेचा पाने ओपन लूप पंप स्टोरेज प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठीचा अर्ज म.प्र.नि.मंडळास प्राप्त झाला.

अपर जिल्हादंडाधिकारी, पुणे यांच्या दिनांक १०/०९/२०२४ च्या पत्रानुसार जनसुनावणीसाठी दिनांक १८/१०/२०२४ ही तारीख निश्चित करण्यात आली. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश क्रं. ई- १६५/२०२४, व्दारा पत्र

क्र.बीओ/जेडी(डब्लुपीसी)/पीएच/बी-२४१०१०-एफटीएस-००८१, दिनांक १०/१०/२०२४ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित करण्यात आलीः-

१. **मा.ज्योती कदम** - **अध्यक्ष**
मा. निवासी उपजिल्हाधिकारी-पुणे तथा
(अपर जिल्हादंडाधिकारी,पुणे)

२. **श्री. जगन्नाथ साळुंखे** - **सदस्य**
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे

३. **श्री.कार्तिकेय लंगोटे,** - **समन्वयक**
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे-१.

४.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार जनसुनावणीच्या ३० दिवस अगोदर सदर प्रकल्पाची जनसुनावणी प्रकल्प स्थानावर आज शुक्रवार दिनांक १८/१०/२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता असल्याची जाहिर सूचना दिनांक १४/०९/२०२४ च्या स्थानिक मराठी वृत्तपत्र लोकसत्ता व इंग्रजीत राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यात प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय सूचना, टीकाटिप्पणी, आक्षेप जनतेस, पर्यावरण क्षेत्रात काम करणा-या संस्था यांना करण्यात आलेले होते.

तसेच या प्रकल्पाचे दस्तावेज म्हणजे पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांश अहवालाची इंग्रजी व मराठी प्रत जनतेच्या माहितीसाठी व अवलोकनार्थ शासनाच्या अधिसूचित कार्यालयांमध्ये म्हणजे जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे., जिल्हा उद्योग केंद्र, पुणे. , जिल्हा परिषद कार्यालय, पुणे. , प्रादेशिक कार्यालय व उप प्रादेशिक कार्यालय पुणे-१, मप्रनि मंडळ, जोग सेंटर, २ रा व ३ रा मजला, वाकडेवाडी, पुणे-मुंबई रस्ता, पुणे- ४११ ००३., मा. सदस्य सचिव, मप्रनि मंडळ (मुख्यालय), कल्पतरू पॉईंट, तिसरा मजला, सायन-माटुंगा स्किम रोड क्र. ७, सिनेप्लॅनेट समोर, सायन सर्कल जवळ, सायन (पूर्व), मुंबई-२२., झोनल कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरीयाट बिल्डींग, तलमजला, ईस्ट विंग, सिव्हील लाईन, नागपूर- ३२., उपविभागीय अधिकारी, उपविभागीय कार्यालय, भोर, ता.भोर, जि.पुणे.,तहसिलदार, तहसिल कार्यालय - वेल्हे, ता.वेल्हे , जि.

पुणे. ,ग्रामपंचायत कार्यालय, टेकपोले, मानगाव, हारपुड, गोंडेखेल, घोल, मोहारी, घिसर, कोशिमघर, शिरकोली, भोरडी, निवी, जाधववाडी, कोळंबी, कानन,केकंद, गेव्हांडे, ता. वेल्हे, जि. पुणे.,ग्रामपंचायत कार्यालय, तव, ता. मुळशी, जि. पुणे., प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संकेत स्थळ येथे उपलब्ध आहेत असे कळविण्यात आलेले होते.

आयोजक यांनी सांगितले की प्रस्तावित प्रकल्पाविषयी लेखी सूचना द्यावयाच्या असल्यास त्या म.प्र.नि.मंडळाच्या प्रतिनिधीकडे देण्यात याव्यात. त्या अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना सादर करता येतील. ज्यांना तोंडी प्रश्न विचारायचे असतील, त्यांनी सादरीकरणानंतर आपले नांव व गाव स्पष्टपणे सांगून मांडावेत. प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार त्या प्रश्नांची उत्तरे देतील. सदरहू बैठकीचे इतिवृत्त तयार करण्यात येऊन ते म.प्र.नि.मंडळाच्या मुख्यालयातर्फे पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना सादर करण्यात येईल. ही समिती फक्त लोकांचे मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून कोणताही निर्णय वा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. सदरहू सूचना/आक्षेप यांची इतिवृतान्तात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकास सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल पर्यावरण विभागास सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. त्यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

अध्यक्षांनी, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन प्रकल्प अधिका-यांना व त्यांच्या तांत्रिक सल्लागारांना पर्यावरण विषयक उपाय योजनांची माहिती शासनाच्या व स्थानिक भाषा मराठीतून करण्याची सूचना केली व सर्व जनसमूहाला निर्भयतेने त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचनाअसल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले.

अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाने नियुक्त केलेल्या तांत्रिक सल्लागारांनी पर्यावरण विषयक प्रकल्पाचे सादरीकरण केले. या सादरीकरणामध्ये सल्लागारांनी सांगितले की, मे. जे.एस.डब्लू. एनर्जी पीएसपी सेवेन लिमिटेड च्या १५०० मेगावॅटच्या पाने ओपन लूप पंप्ड स्टोरेज प्रकल्पाच्या आजच्या सुनावणीत उपस्थितांचे सर्वांचे स्वागत सदर प्रकल्प मौजे पाने व वाघेरी ता. महाड जि. रायगड व मौजे खानू ता. वेल्हे जि. पुणे महाराष्ट्र या दोन जिल्हयामध्ये प्रस्तावित आहे सदर प्रकल्पांची ओळख थोडक्यात आपणास देत आहोत. जे.एस.डब्लू. एनर्जी पीएसपी सेवेन लिमिटेड ही जे.एस.डब्लू नियो एनर्जी लिमिटेड अंतर्गत एक विशेष उद्देश सोहळा कंपनी आहे. ही जे.एस.डब्लू एनर्जी लिमिटेड ची १००% दुय्यम अंगभूत यशस्वी कंपनी आहे. या प्रकल्पाचा कालानुक्रम सदर प्रकल्पाची पर्यवेषक पोर्टलवर अर्ज

दि.२७/११/२०२३ रोजी सादर करण्यात आली त्यानंतर MoEF आणि CC, नवी दिल्ली यांच्याद्वारे TOR ३०/०१/२०२४ रोजी जारी केले. बेस लाईन मॉनिट्रींग आणि डेटा संकलन दोन टप्प्यांमध्ये करण्यात आले. मान्सुन पश्चात ऑक्टोबर ते डिसेंबर २०२२ आणि मान्सुन पुर्व मोसम मार्च ते मे २०२३. TOR मध्ये दुरुस्तीसाठी अर्ज २७/०९/२०२४ रोजी करण्यात आला त्यानुसार सार्वजनिक सुनावणीच्या जाहीराती दोन टप्प्यांच्या पत्रामध्ये देण्यात आलेल्या इंडियन एक्सप्रेस आणि लोकसत्ता १४/०९/२०२४ रोजीच्या वृत्तपत्रामध्ये या जाहीरात देण्यात आल्या. सदर पम्प स्टोरेज प्रकल्पाची सामान्य प्रक्रिया अशी आहे की, खालचा जलाशय फक्त एकदा भरला जाईल, खालच्या नदीच्या पाण्याची आवश्यकता भरण्यासाठी १४.१८४ MCM पाणीच्या आवश्यकता असेल, त्यांनतर दिवसा सौरपंपद्वारे सदर पाण्यासाठी पंम्पींग करुन वरच्या जलाशयात आणला जाईल आणि पीक हावर मध्ये आता रात्री वरच्या जलाशयाचे पाणी प्रेशरने खाली सोडून त्याद्वारे वीज निर्मिती केली जाईल. सदर वीज दूहेरी सर्किटद्वारे ट्रान्मिशन पावर ग्रिडला जोडली जाईल. प्लॅनचा आराखडा पीपीटीद्वारे सादर करण्यात आला. १० किलोमीटर त्रिजेच्या अभ्यग क्षेत्रातील राष्ट्रीय उद्यान नॅशनल पार्क वन्यजीव अभयारण्य बायोस्फियर रिझर्व्ह, व्याघ्र प्रकल्प, वन्यजीव कॉरीडॉर राखीव /संरक्षित जंगले- काहीही नाही. तसेच १० किलोमीटर त्रिजेच्या अभ्यग क्षेत्रातील राखीव/संरक्षित जंगले- प्रस्ताविक प्रकल्पाचा १० किलोमीटर अभ्यास क्षेत्रात ९ आरक्षित जंगले आहेत. प्रकल्प क्षेत्र हा भारताचा भुकंपीय क्षेत्र नकाशा २००२ च्या IS १८९३ भाग १ नुसार झोन ४ म्हणजेच उच्च जोखीम क्षेत्र् अंतर्गत येते. त्याचे जे पर्यावरणीय नकाशा सेटींग आहेत ते पीपीटीद्वारे थोडक्यात दाखविले. तसेच प्रकल्पाच्या मुलभूत गरजा हा एकूण प्रकल्प २९३.५० हेक्टरवर, खाजगी २१७.८५ हेक्टर आणि वन ६६.९१ हेक्टर आणि शासकीय जमिनी ८.७४ हेक्टर कंपनीने क्षेत्रफळवाढी संदर्भात पुनर्मुल्यांकन केले आहे. तसेच पाणी १४.१८४ MCM जलाशयय एका वेळी भरण्यासाठी लागणार आहे. त्यानंतर १.०१ MCM दरवर्षी बाष्पीभवनाचे नुकसान भरुन काढण्यासाठी पाण्याची आवश्यकता लागेल. मनुष्यबळ या प्रकल्पासाठी जे लागणार आहे ते बांधकाम टप्प्यामध्ये कायमस्वरुपी कर्मचाऱ्यांची संख्या १२५ असेल आणि कंत्राटी कर्मचाऱ्यांची संख्या २१०० असेल आणि ऑपरेशनल दरम्यान ज्यावेळेस प्रकल्प सुरु होईल त्या दरम्यान कायमस्वरुपी मधील संख्या १०० असेल व कंत्राटी कर्मचाऱ्यांची संख्या ७० असेल. प्रकल्पाचा खर्च ७४१९.६० कोटी रुपये अपेक्षित आहे. पर्यावरण संवर्धनासाठी कंपनीने भांडवली खर्च ६७.७५ कोटी रुपये राखीव ठेवलेला आहे. तसेच आवर्तीक खर्च १.७३ कोटी प्रत्येक वर्षासाठी संरक्षित केलेला आहे. प्रकल्पाच्या ठिकाणचे सुक्ष्म हवामानशास्त्र आपण जे पंच ऋतू पाहतो तो वारजे दिशा अशा प्रकारे त्याप्रमाणे मान्सुन पश्चात दोन्ही ऋतू मध्ये याची दक्षता घेतली आहे. परिसरातील हवामान ध्वनी निरीक्षण केंद्र आणि भूप्रशासन पाणी व भूजल मातीची नमुने

घेणारी केंद्रे दाखवणारी ही एक मुख्य योजना आहे. त्यानंतर पर्यावरण बेस लाईन मॉनिट्रींग जो आपण केला आहे. तो ऑक्टोबर ते डिसेंबर २०२२ आणि मार्च ते मे २०२३ या दोन काळामध्ये केला आहे. परिसरातील हवेची गुणवत्ता देखरेख सुध्दा ८ ठिकाणी केली. दोन्ही पातळीवरील देखरेख ८ ठिकाणी, पृष्ठभागावरील ८ ठिकाणचे पाण्याचे नमुने घेतले, भुजलाचे १० नमुने घेतले, मातीचे नमुने १० ठिकाणचे घेतले आणि हे सर्व नमुने पर्यावरण मंत्रालयाच्या तकत्यानुसार त्या मर्यादेमध्ये आहेत. तसेच पर्यावरणाचे व्यवस्थापन बांधकामादरम्यान नियंत्रीत पध्दतीने ब्लास्टिंगची खात्री केली जाईल. तसेच हवेचे प्रदुषण नियंत्रीत करण्यासाठी सिमेभोवती रस्त्यावरती हरित पट्टा वितरीत केला जाईल, वृक्षारोपण केले जाईल तसेच ध्वनीप्रदुषण होऊ नये त्यासाठी व्यवस्थापन योजना केलेली आहे. CPCB मार्गदर्शन तत्वांनुसार आवाज कमी करण्यासाठी डिझेल जनरेटर सेट मध्ये ध्वनीक आवरण बसवली जाईल. तसेच ध्वनी पातळीचे वारंवार अधुनमधुन नियमित परिक्षण केले जाईल. पर्यावरणाचे व्यवस्थापन पाणी गुणवत्तेचे व्यवस्थापन करण्यासाठी बांधकामाच्या टप्प्यात लेबर कॅम्पसाठी ३५ KLD चा पोर्टेबल STP बसवला जाईल आणि त्यातून ते पाणी जे वापरले जाईल त्याचा पुनर्वापर केला जाईल तसेच घनकचरा च्या व्यवस्थापनासाठी विविध योजना राबविल्या जातील त्यामध्ये सेंद्रिय कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी प्रत्येकी ५०० किलो चा २ ऑरगॅनिक वेस्ट कनव्हरर्टर बसविण्यात येतील आणि पुढे जावून याचा पुनर्वापर केला जाईल, त्यात पोषक घटक असल्याने त्याचा वापर कचऱ्याची विल्हेवाटीसाठी केला जाईल. कचरा निर्मिती व व्यवस्थापनाचे तपशिल जो चिखल निर्माण होईल त्याचा पण तिथेच पुनर्वापर केला जाईल आणि ५०% डम्पींग साईटवर त्याची विल्हेवाट केली जाईल आणि इतर जो कचरा निर्मित होईल त्याची योग्यप्रकारे विल्हेवाट कंपनीतर्फे केली जाईल. Green belt व हरित पट्टा तपशिल एकूण २९३.५० हेक्टर प्रकल्प क्षेत्रांपैकी ७.१९ हेक्टर क्षेत्रामध्ये हरीत पट्टा विकसित केला जाईल १ हजार रुपये प्रति हेक्टर अशी घनता राखली जाईल आणि अशा प्रकारे green belt हरित पट्टयाच्या दरम्यान जी काही उपाययोजना करण्यात येईल ते खालीलप्रमाणे:-

१) पर्यावरणाचे नियोजन करण्यासाठी कंपनीने बजेट प्रसारित केलेले आहे. त्यामध्ये पाणलोट क्षेत्र उपचार योजना यासाठी ३ कोटी भांडवली खर्च अपेक्षित आहे पुनर्स्थापन व पुनर्योजना ३५कोटी चिखल व्यवस्थापन योजनेसाठी ०.२५ कोटी पुरक वनीकरण योजना ३ कोटीत तसेच वन्यजीव व विविध योजना यासाठी ३ कोटी आणि पाणलोट व्यवस्थापन यासाठी कंपनी ५ कोटीचा खर्च अपेक्षित आहे, हा संपूर्ण खर्च थोडक्यात मोठा आहे परंतू पुर्ण खर्च ६७.७५ कोटी आहे आणि प्रत्येक वर्षी १.७३ कोटी खर्च अपेक्षित आहे. पुनर्वसन व पुनर्स्थापना तपशिल प्रस्ताविक प्रकल्पामुळे हे ३ गावातील २८३ प्रकल्प प्रभावित होतील आणि खरेदी केलेले खाजगी जमीनीचे मुल्य थेट

वाटाघाटी व प्रस्तावाने मान्य केलेल्या अटी व आधारित जमिनमालकाला दिले जाईल. पुनर्वसन व पुनर्स्थापना लाभ विविध प्रकारच्या प्रकल्पग्रस्तांना देण्यात येणार आहे त्या प्रकल्पामुळे जे फायदे होणार ते म्हणजे रोजगाराच्या संधी सामाजिक आर्थिक विकास हरित पट्टा विकास होईल. तसेच नैसर्गिक साधनसंशोधनाचा कमीतकमी वापर केला जाईल रेनवॉटर हारवेस्टिंग , भूजल पुनर्रभरण परत केले जाईल व नुतनीकरणक्षम उर्जा संकलन जास्तीत जास्त करण्याचा कंपनीचा मानस आहे.

२) तसेच कंपनी सामाजिक आर्थिक वारंवार प्रयत्नशील आहे आणि यामध्ये जे आपण मुद्दे आहेत महिला सशक्तीकरण अशा जिवनमान उंचावण्याचे, सांस्कृतिक कार्यक्रम, कौशल्य विकास, आरोग्य, शिक्षण या सर्व गोष्टींवर लक्ष देऊन कंपनी सामाजिक आर्थिक विकास साधण्याचा प्रयत्न करेल. व्यवसायाशी संबंधीत आरोग्य व सुरक्षा यांमध्ये आरोग्य सुरक्षा पर्यावरणाची पुर्णपणे काळजी घेतली जाईल प्रकल्पात काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची प्राथमिक वैद्यकीय तपासणी करणे अनिवार्य असल्यानंतर नियुक्ती केलेल्या प्रत्येक व्यक्तीची नियतकालीन वैद्यकीय तपासणी नियमित अंतराने केली जाईल.

तसेच व्यावसायीक आरोग्य जे कार्यक्रम फुफ्फुसाचे कार्याचे विश्लेषण आवाजाच्या संपर्कात आलेले अशा प्रकारे त्यांमध्ये मुलभूत उपाय केले जातील. आतापर्यंत कंपनीने काही सामाजिक आर्थिक कामे केलेली आहेत डीगेवस्ती, टेकपोळे येथे शालेय विद्यार्थ्यांला स्टेशनरी, स्कुलबॅग, ट्रकसूट, पांढरेस्पोर्टसशूज इत्यादी वाटप केले तसे काडसरी लिंगाना, पाने येथील आंगणवाडी व प्राथमिक शाळेतील मुलांना शालेय साहित्य वाटप केले, वास्तविकतः हा कंपनीचा निरंतर प्रयत्न असतो प्रकल्पाच्या अगोदर हि कंपनी कार्य करत असते पाने व काडसरी लिंगाना ग्रामस्थांना सतरंजी व रेनकोटचे वाटप केले पाने गाव येथील माध्यमिक शाळेतील विद्यार्थीनीना सायकलची वाटप केली. डीगेवस्ती वरती माध्यमिक शाळेतील मुलींना सायकलची वाटप केली. पाने, टेकपोळे, काडसरी लिंगाना येथे पंख्याची वाटप केली, टेकपोळे, डीगेवस्ती, खानू येथे पाण्याच्या टाक्या वाटप केल्या. टेकपोळे, काडसरी लिंगाना, पाने येथे RO सह वॉटर कुलर दिलेली आहेत. कंपनी सामाजिक आर्थिक वार्षिक क्षेत्रामध्ये सर्व गावकऱ्यांच्या ग्रामस्थांच्या सदैव पाठीशी राहिल.

**खालील व्यक्तींनी चर्चेत भाग घेतला व त्यास पर्यावरण सल्लागार व प्रकल्प प्रवर्तक यांनी दिलेली उत्तरेः-**

१) **दिनकर बामगुडे माजी सरपंच टेकपोळे**- हा प्रोजेक्ट येथे आल्यानंतर आमच्या ग्रामस्थांना याचा काय फायदा होईल? आमच्या वाड्यावस्त्यावर लाईट नाही तर या कंपनीने आम्हांला सोलर सिस्टीम ची व्यवस्था करुन दिली तर फायदा होईल ? जर हा प्रोजेक्ट झाला तर आमच्या मुलांना कंपनीने कामाला घ्यावे. आमची मुले बेरोजगार आहेत व ते इतरत्र शहरांमध्ये कामासाठी जात आहेत. आपण या मूलांना कामाची संधी द्यावी अशी आमची मागणी आहे ?

त्यावर प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सोलर ची व्यवस्था करुन देण्यासाठी आम्ही विशेष प्रयत्नशील राहू. रोजगाराच्या बाबतीत प्रथम प्राधान्य कंपनी खेडयापाड्यातील जवळच्या व स्थानिक लोकांना कायमस्वरुपी नोकरी मिळावी यासाठी कंपनी तत्पर राहील.

२) **संतोष कोकरे ग्रामपंचायत टेकपोळे माजी सरपंच** :-स्थानिक लोकांना रोजगारासाठी प्रथम प्राधान्य दिले पाहिजे? आरोग्याची व्यवस्था नाही आहे तर त्याची सुविधा केली पाहिजे? रस्तांची स्थिती फार विकट आहे तर त्यासाठी काही प्रयत्न करावेत?
त्यावर प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आम्ही स्थानिक लोकांना प्राधान्य देवू. मेडिकल कैम्प आयोजित करणार आहोत जेणेकरुन स्थानिक लोकांच्या आरोग्याची काळजी घेतली जाईल त्याप्रमाणे आम्ही नेहमी प्रयत्नशील राहू.

३) **म्हाळु कोकरे डीगेवस्ती**:- आज दीघेवस्ती, चांदोर, खानु ची वस्तुस्थिती मांडायची म्हटल तर एक एकर जमिनीमध्ये चार पाच खाती आहेत आणि त्या जमिनीमधून रोड गेलेला आहे आणि ती आमची इमारती बांधलेल्या आहेत तर त्याच्याबद्दल कंपनीने विचार करावा व त्याबद्दल काही मोबदला तरी देण्यात यावा? दोन एकर जमिनीमध्ये अर्ध्या एकर जर रस्त्यामध्ये जात असेल तर आम्ही काय कराव असे ही त्यांनी प्रश्न उपस्थित केला?
त्यावर प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, जेव्हा आपल्या कंपनीला रस्त्याची गरज असेल तेव्हा तेथील जमिनदारांचा व खातेधारकांशी चर्चा विनिमय करुन निर्णय घेण्यात येतील. कंपनी मोबदल्याबाबत नक्कीच विचार करेल त्याबाबत बिंधास्त रहा.

४) **खानु गावचा रहिवासी** - जो प्रोजेक्ट होत आहे त्या ठिकाणी आमची कुलदेवी कैकयीमाता देवी आहे तर सर्व ग्रामस्थांची व खेडयापाडयातील लोकांची मागणी आहे की त्याची कोठे तरी योग्य विल्हेवाट लावावी मंदीरासाठी जागा द्यावी व त्याचे कोठे तरी सोय करावी?

त्यावर प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, ग्रामस्थांनी आणि ग्रामपंचायतीने सुचविलेल्या ठिकाणी आराखड्याप्रमाणे योग्य तश्या प्रकारे मंदिर बांधून दिले जाईल.

५) **शिंदे धिरज,खानू गावातील रहिवासी** - जिल्हा परिषदेची शाळा नियमित चालु व्हावी सर्व बालविद्यार्थ्यांना नियमित शिक्षण भेटाव त्याचबरोबर रस्त्याची खूप दूरावस्था आहे. कोणतीही गाडी येताना खूप त्रास होता त्यासाठी पुर्णपणे रोड व्यवस्थित करावेत अशी विनंती?
**अपर जिल्हादंडाधिकारी मा. ज्योती कदम:-** हा प्रश्न जिल्हा परिषदेचा आहे तो बीडीओ कडे सोपविण्यात यावा व तहसिलदार आपण त्याची योग्यरीतीने तपासणी कराल. तुमचा जो फंड आहे पर्यावरणीय जबाबदारी फंड आणि तुमचे किती बजेट आहे ते तुम्ही दरवर्षी किती वापरणार आहात? कंपनीच्या प्रोजेक्ट मध्ये त्याचा उल्लेख केला नाही आहे का असा प्रश्न ही त्यांनी उपस्थित केला?
त्यावर प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, ६७ करोडचा प्रोजेक्ट आहे ६४ करोडचे बजेट ६७ करोड मधले आम्ही दरवर्षी पावणे दोन करोड वापरणार आहोत.
**अपर जिल्हादंडाधिकारी मा.ज्योती कदम-** जबाबदारी म्हणून का सीएसआर म्हणून पर्यावरणीय फंड वापरताना ज्या ग्रामपंचायती तुमच्याशी संलग्न आहेत त्यांच्याबरोबर चर्चा करून आणि त्यांच्या मताने आपण तो फंड वापरला म्हणजे गावकऱ्यांना त्याचा फायदा होईल.
त्यावर प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, जे काही तुमच्या सुचना असतील त्याच्यावर नक्कीच काम करु.

**समन्वयक श्री कार्तिकेय लंगोटे, उप-प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि. मंडळ पुणे-१-** माझी एक सूचना आहे मा. अध्यक्ष महोदयांनी सुचविल्याप्रमाणे तसेच जे फंड करताना डुप्लीकेट होणार नाही त्यामुळे हे सगळ करताना स्थानिक प्रशासनाचा विचार व त्यांच्या जाहीर सुचना आराखड्याप्रमाणे मंजुर करुन घ्यावेत.
त्यावर प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, त्याप्रमाणे काम करु.

**सदस्य श्री जगन्नाथ साळुंखे, प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि मंडळ पुणे,** बांधकाम चालु असतान जे काही प्रदुषण होणार आहे पर्यावरणाचा ऱ्हास होणार या संदर्भात होणारे ब्लॉस्टिंग असेल त्या संदर्भात काय केले पाहिजे काय उपाययोजना होणार आहेत हे संदर्भात उल्लेख दिसत नाहीत. हा महत्त्वाचा मुद्दा? स्थानिकांची जी गावोगावी शेती आहे त्या शेतीच नुकसान झाले नाही पाहिजे याची खबरदारी तुम्ही पुर्णपणे घ्यायची आहे. प्रत्येक गावात जावून स्थानिक लोकांना माहिती देणे, शिक्षण देणे त्यांचे जिवनमान उंचावणे आणि कोणत्याही कार्यान्वये विषयी साधनसंपत्तीचा आघात न होणे, धुलीकरणाचा, ब्लास्टिंगचा अशा प्रकारे कोणताही आघात होणार नाही याची काळजी आपण घेतली पाहिजे. स्थानिकांमध्ये त्याची जनजागृती करायची आहे?

त्यावर प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, जेव्हा पण पर्यावरणानुसार काम करणार आहोत, बांधकाम करताना नियंत्रीत पध्दतीने ब्लास्टिंग केले जाईल कामगार आणि कर्मचाऱ्यांना वैयक्तिक संरक्षण पुरविले जातील हवेचे प्रदुषण रोखण्याकरिता ठिकठिकाणी हरित पट्टा, वृक्षारोपण तसेच स्प्रिंकली ऑफ वॉटर केल जाईल लेबर कॅम्प आणि ऑफीस च्या येथे वनीकरण केले जाईल बोगद्याच्या आत मध्ये ऑक्सिजन वी सुविधा करणार आहोत.

६) **शांताराम भोर, खानू**- ज्या गावकऱ्यांच्या जमिनी आहेत त्या पाठीमागे बऱ्याच वेळेस फसवणूक करुन जमिनी ताब्यात घेतलेल्या आहेत तर ज्यांच्या जागा आहेत त्यांच्याशी विचारपूस करुन व त्यांना विश्वासात घेऊन त्याबाबतची कल्पना द्यावी. कंपनीने व सरकारने जागेची माहिती व पाठपुरावा करावा, मोबदला देण्यात यावा व नंतरच मग पुढील गोष्टींचा विचार करण्यात यावा?

त्यावर प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, याचे उत्तर यापुर्वी आम्ही दिले आहे.

समन्वयकांनी असे सांगितले की, पर्यावरणविषयक कोणतेही प्रश्न व विचार मांडत नाहीत त्यामुळे समन्वयकांनी सभा संपवण्याची विनंती अध्यक्षांना केली व त्यांचे आदेश घेऊन अध्यक्षांचे व उपस्थितांचे आभार मानून लोकजाहीर सूनावणी संपली असे जाहीर केले.

**(श्री.कार्तिकेय लंगोटे)**
समन्वयक
उपप्रादेशिक अधिकारी, पुणे- १,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे

**(श्री. जगन्नाथ साळुंखे)**
सदस्य
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे

**(मा.ज्योती कदम)**
अध्यक्ष
मा. निवासी उपजिल्हाधिकारी-पुणे तथा
अपर जिल्हादंडाधिकारी,पुणे